Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 17 November 2026

Time 7.10 to 7.20 AM

Language Marathi

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

प्रादेशिक बातम्या

दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत अनुसुचित जाती जमाती आरक्षण नियमात हस्तक्षेपास सर्वोच्च न्यायालयाचा नकार
- दिवंगत अजित पवार यांचं महाराष्ट्रासह सहकार क्षेत्राच्या विकासासाठी दिलेलं योगदान महत्त्वपूर्ण-केंद्रीय मंत्री अमित शाह यांचे गौरवोद्गार
- भटक्या-विमुक्त समाजाच्या वस्त्यांना भेट देऊन मंत्री संजय राठोड यांचा नागरिकांशी संवाद, परभणीत पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक
- नांदेड जिल्ह्यातील सर्व १६ तालुके एक वर्षासाठी पाणी टंचाई क्षेत्र म्हणून घोषीत

आणि

- आयसीसीच्या अध्यक्षपदी जय शाह यांची पुढच्या दोन वर्षांसाठी बिनविरोध फेरनिवड

****

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमधल्या अनुसुचित जाती जमाती आरक्षण नियमात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. हा धोरणात्मक निर्णय असल्याचं सांगत सर्वोच्च न्यायालयानं, अनुसूचित जाती जमातीसाठी आरक्षित जागांसाठीचे चक्रानुक्रम धोरण बदलण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली. मात्र, सदर याचिकाकर्त्यांना राज्य सरकारकडे दाद मागण्याची मुभा न्यायालयाने दिली आहे. राज्य सरकारनं गेल्यावर्षी हे नियम लागू केल्यावर होणाऱ्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी होणार होती. यामुळं विद्यमान आरक्षण पद्धत विस्कळीत होते आणि

त्या मतदारसंघातून निवडणूक लढवायला इच्छुक असणाऱ्या उमेदवारांचं भवितव्य धोक्यात येत असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता.

****

दिवंगत अजित पवार यांनी महाराष्ट्राचा विकास आणि सहकार क्षेत्राच्या विकासासाठी दिलेलं योगदान महत्त्वपूर्ण असल्याचं, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. काल पुणे जिल्हा परिषदेच्या आवारात अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचं लोकार्पण शाह यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या विकासाची प्रक्रिया सुरू असताना महाराष्ट्राचाही विकास त्याच प्रवाहाशी जोडला जावा, अशी अजित पवार यांची भूमिका होती. त्यामुळेच त्यांनी महायुतीमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला, असं शहा यांनी नमूद केले.

अजित पवार यांच्या स्पष्टवक्तेपणाचं कौतुक करतांना शाह म्हणाले...

बाईट – केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, ज्येष्ठ नेते शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. अजित पवार यांच्या अपघाताच्या चौकशीचा अंतिम अहवाल लवकरात लवकर जाहीर करावा अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांना यावेळी केली.

अजित पवार यांच्या छायाचित्र दालनाचं उद्घाटन, कॉफी टेबल बुकचं प्रकाशन आणि त्यांच्या जीवनकार्यावर आधारित लघुपटाचे प्रदर्शनही यावेळी करण्यात आलं.

****

झपाट्याने बदलणारं माध्यम क्षेत्र तरुण पत्रकारांसाठी नवीन संधीसोबतच नवी आव्हानंही घेऊन येणार असल्याचं, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. काल 'राष्ट्रीय प्रेस दिनानिमित्त नवी दिल्लीत 'प्रेस कौन्सिल'च्या कार्यक्रमात ते बोलत होते. सोशल मीडियाच्या नियमनाबाबत पुरेशा तरतुदींची गरज व्यक्त करत, नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा उपलब्ध करुन देण्याच्या आवश्यकतेवरही वैष्णव यांनी भर दिला.

****

आदिवासी समाजातील वनपट्टाधारक शेतकऱ्यांना आता गाव नमुना ७-ई आणि १२-ई उतारे देण्यात येत आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. राज्यातील ११ जिल्ह्यांमधील ३५ विधानसभा मतदारसंघांत ही मोहीम राबवण्यात येणार असून, १५ डिसेंबरपर्यंत पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्याचं उद्दिष्ट आहे.

****

भटक्या-विमुक्त जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण महत्त्वाचे असून, समाजातील मुला-मुलींनी शिक्षणाच्या संधींचा लाभ घेऊन प्रगती साधावी आणि मुख्य प्रवाहात यावं, असं आवाहन मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केलं. काल छत्रपती संभाजीनगर इथे भटक्या-विमुक्त समाजाच्या वस्त्यांना भेट देऊन नागरिकांशी त्यांनी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मंत्री राठोड यांच्या हस्ते शिधावाटप करण्यात आला. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी कलोसे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि समाजबांधव यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, जिल्ह्यातील जलसंधारण प्रकल्पांची राठोड यांनी पाहणी केली. खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव आणि कन्नड तालुक्यातील मेहगाव येथील विविध विकासकामांचा त्यांनी आढावा घेतला. मेहगाव इथल्या पूलवजा बंधाऱ्याचं लोकार्पणही राठोड यांच्या हस्ते करण्यात आलं.

****

भटके-विमुक्त समाजातील वंचितांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करून प्राधान्याने कार्यवाही करावी, अशी सूचना पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केली आहे. काल परभणी इथं जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत पालकमंत्री बोलत होत्या. या नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचं बोर्डीकर यांनी सांगितलं.

****

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा केलेली प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत शेतकरी कुटुंबांसाठी मोलाचा आधार ठरली आहे. या मदतीबद्दल छत्रपती संभाजीनगर,

जालना, बीड आणि परभणी जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रियांमधून समाधान व्यक्त करत राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

****

धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी काल पुण्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत चर्चा केली. जनावरांसाठी पुरेसा चारा, तसंच पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून देण्यासाठी विशेष उपाययोजना राबवण्याची मागणीही त्यांनी केल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यातील सर्व १६ तालुके एक वर्षासाठी किंवा पुढील आदेशापर्यंत 'पाणी टंचाई क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण आदेश जारी केले आहेत, जिल्ह्यात शेती अथवा औद्योगिक वापरासाठी ६० मीटरपेक्षा अधिक खोल विहीर किंवा बोअरवेल खोदण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून ५०० मीटरच्या परिघात कोणत्याही प्रयोजनासाठी नवीन विहीर अथवा बोअरवेल खोदता येणार नसल्याचं आदेशात म्हटलं आहे.

****

आयसीसी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदी जय शाह यांची पुढच्या दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी बिनविरोध फेरनिवड करण्यात आल्याचं आयसीसीने काल जाहीर केलं. इंडोनेशियात बाली इथं काल झालेल्या आयसीसी बोर्डाच्या बैठकीत त्यांच्या फेरनिवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आलं. जय शाह, यापूर्वी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव म्हणून कार्यरत होते, त्यांनी डिसेंबर २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या या सर्वोच्च नियामक संस्थेच्या अध्यक्ष पदाची धुरा हाती घेतली होती.

****

राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल पद्धतीने हयातीचा दाखला सादर करणे सुलभ व्हावे, यासाठी छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि लातूर जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीनं उद्यापासून २३ नोव्हेंबरपर्यंत विशेष कार्यशाळांचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्र शासनाच्या

'जीवन प्रमाण' या संकेतस्थळाद्वारे डिजिटल हयातीचा दाखला सादर करण्याच्या प्रक्रियेबाबत या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

****

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सहकार पॅनलनं १९ पैकी १४ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलं. तर परिवर्तन पॅनलला पाच जागांवर विजय मिळाला. काँग्रेस नेते धीरज देशमुख यांच्या नेतृत्वात विजयी उमेदवारांची भव्य मिरवणूक काढून जल्लोष करण्यात आला.

****

सरकारनं १९८१ पासून आदिवासी विकासाचा संपूर्ण लेखाजोखा जाहीर करून श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, या मागणी करिता नांदेडमध्ये रविवारी आदिवासी कोळी महादेव, कोळी मल्हार, टोकरे कोळी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर निषेध आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.

****